महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,वजिराबाद,नांदेड
Ph.No.&Fax No.(02462) 234026 E-mail ID:- gac.nanded@gmail.com

जा.क्र.शाआमनां/अस्था/ डे-१/ २२८५ /२०२१ दिनांक: ०२/०७/२०२१

# कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत

संदर्भ :- १.शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्रं.एमईएस-१५०८/प्रक्रं९४/०८/वैसेवा-१, दि.०७.०९.२०११
२.क्रं.आसंमु/आस्था/कपनि/२०२१/आयु-३/७५५८/दि.११ जुन २०२१

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड येथिल विविध विषयांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांवर कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यासाठी दिनांक १२.०७.२०२१ रोजी सकाळी ०१-०० वाजता मुलाखत आयोजित करण्यात येत आहे. तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने उपलब्ध असलेल्या पदांचा विषय व तपशिल खालीलप्रमाणे आहे.
(थेट मुलाखत Waik in interview घेण्यात येणार आहे.)

रिक्त पदांचा तपशिल:-

| विषय | प्राध्यापक | | | विषय | सहयोगी प्राध्यापक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण रिक्त पदे | सर्व साधारण | | | एकुण रिक्त पदे | सर्व साधारण |
| कायाचिकित्सा | १ | १ | | शालाक्य | १ | १ |
| रोगनिदान | १ | १ | | शरीरक्रिया | १ | १ |
| पंचकर्म | १ | १ | | कौमारभृत्य | १ | १ |
| संस्कृत-संहिता-सिध्दात | १ | १ | | स्वस्थवृत्त | १ | १ |
| | | | | शरीररचना | १ | १ |
| द्रव्यगुण | १ | १ | | रसशास्त्र | १ | १ |
| शल्यतंत्र | १ | १ | | पचंकर्म | १ | १ |
| एकुण | ६ | ६ | | एकुण | ७ | ७ |

**टिप**:-मुलाखतीच्या दिवसापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन सवंधीत विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदाचा पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास,त्या सवंधीत विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदासाठी केलेल्या अर्जाचा करार पध्दतीने नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

| पदनाम | प्राध्यापक |
|---|---|
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत |
| शैक्षणिक अर्हता | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. अठ्ठाविस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली भारतीय केंद्रीय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता<br>२) सांविधिक विद्यापिठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाकडुन शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मुलभुत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहिण्यास, बोलण्यास व वाचण्यास समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | प्राध्यापक पदासाठी संबंधीत विषयात सहयोगी प्राध्यापक पदाचा अध्यापनाचा एकूण ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा. |
| मानधन | प्रतिमाह रु ५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत) |

| पदनाम | सहयोगी प्राध्यापक |
|---|---|
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत |
| शैक्षणिक अर्हता | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. अठ्ठाविस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली भारतीय केंद्रीय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता<br>२) सांविधिक विद्यापिठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडुन शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मुलभुत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहिण्यास, बोलण्यास व वाचण्यास समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | सहयोगी प्राध्यापक हे पद धारण करणा-या व त्या पदावर ५ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तीमधुन किंवा ज्याला संबंधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतुन संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणुन पाच वर्ष अध्यापनाचा अनुभव असला पाहीजे. |
| मानधन | प्रतिमाह रु ४०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत) |

| | | |
|---|---|---|
| इतर अटी | १ | करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन किंवा आस्थापना मंडळाकडुन वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता, यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | २ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथव शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | ३ | सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| | ४ | मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करणाऱ्या उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा अशा उमेदवाराचा अर्ज त्या प्रवर्गासाठी विचारात घेतला जाणार नाही. |
| | ५ | उमेदवारास नियमित नियुक्ती आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणे पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. |
| | ६ | नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील. |
| | ७ | उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार या व्यतिरिक्त केवळ ८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | ८ | करार पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी १ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास १ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा/तीचा राजीनामा अधिष्ठातांना मंजुर करता येईल. |
| | ९ | करार पध्दतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. असा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |
| | १० | करार पध्दतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पुर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |
| | ११ | करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यक व्यवसाय करण्यास मुभा राहिल.पंरतु कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. |
| | १२ | करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातहीकरार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दा करता येणार नाही तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात घेता येणार नाही. |
| | १३ | नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| | १४ | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांसाठी अर्ज करणारे उमेदवार सद्यस्थितीत कोणत्याही महाविद्यालयात कार्यरत असतील, अशा उमेदवारांना नियोक्त्यांकडुन "ना-हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन घेऊन मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. (ना-हरकत प्रमाणपत्राचा नमुना पुढे दर्शविण्यात आलेला आहे). तसेच प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक . या पदावर शासकीय आयुर्वेद महावि.द्यालय, नांदेड येथे नियुक्ती झाल्यास उमेदवाराला |

| | | |
|---|---|---|
| | | पूर्वीची नोकरी सोडावी लागेल. |
| | १५ | शासन/सक्षम प्रधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवळी निश्चित होणारे पदासबंधीच्या आवश्कतेप्रमाणे बंधपत्र देणे बंधनकारक राहील.तसेच शासन/सक्षम प्रधिकरण कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबधितास बंधनकारक राहील. |
| | १६ | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |

## - ना हरकत प्रमाणपत्र -

प्रमाणित करण्यात येते की, वैद्य/वैद्या ........................ या महाविद्यालयात दिनांक ........ पासुन ........... या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या .... .................. यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथे प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक या पदावर करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | प्राचार्य |
|---|---|
| .................. | .................. |
| .................. | .................. |
| .................. | .................. |

ठिकाण :-

दिनांक

इच्छुक उमेदवारानी WWW.mahayush.gov.in/www.gacnanded.com या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुण्यातच अर्ज भरुन दिनाक ०९-०७-२०२१ रोजी सण्याकाळी ५-३० वाजेपर्यत अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,वजिराबाद,नांदेड येथे सादर करावेत प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक———— विषयाचे नांव पदावरील कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या "नियुक्तीसाठी अर्ज" असे ठळक अक्षरात लिहावे,विहितकालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही (टिप -अर्जासोबत कोणत्याही प्रकारचे कागदपत्र जोडु नयेत)

कंत्राटी पध्दतीने भरण्यांत येणा-या प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक पदाच्या मुलाखतीसाठी अधिष्ठाता यांचे कार्यालय,शसकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड येथे दिंनाक १२-०७-२०२१ रोजी दुपारी ०१-०० वाजता उपस्थित रहावे सदरील ठिकाणी उपस्थित राहणेकरिता आपणास कोणताही अनुषंगिक खर्च दिला जाणार नाही फक्त पात्र उमेदवारानीच उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी.

निवड झालेल्या उमेदवाराची यादी दिंनाक १४-०७-२०२१ रोजी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड कार्यालयातील सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल कोणत्याही उमेदवाराला स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.

सही /-
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
नांदेड

# अर्जाचा नमुना

महाराष्ट्र शासन

## शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन त्यावर स्वतः स्वाक्षरी करणे |
|---|

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक ..................
(विषय) या पदावर करार पध्दतीने ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता नियुक्तीसाठी अर्ज.

| | | | |
|---|---|---|---|
| संपुर्ण नाव | | | |
| | आडनाव | स्वतःचे नाव | वडीलांचे/पतीचे नाव |
| पत्रव्यवहाराचा पत्ता | | | |
| | | पिनकोड | |
| | एसटीडी कोडसह घरचा दुरध्वनी क्रमांक | | |
| | भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| जन्म दिनांक | | | |

अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वयः ......... वर्ष .......... महिने ........ दिवस

राष्ट्रीयत्वः

**शैक्षणिक अर्हताः** बीएएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या साक्षांकित मार्कशिट जोडाव्यात

| अ.क्र. | बोर्डाचे/विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परिक्षेचे नाव | उत्तीर्ण झालेले वर्ष | प्राप्त टक्केवारी | शासकीय सेवेतुन निवृत्त झाले असल्यास प्रथम नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

अवगत असणाऱ्या भाषाः (योग्य त्या ठिकाणी (√) अशी खुण करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत/अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

**कामाचा अनुभव** (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच अनुभव ग्राहय धरला जाईल.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | वेतनश्रेणी व इतर भत्ते | अनुभवाचा कालावधी | विद्यापिठाची मान्यता होती का असल्यास विद्यापिठाचे पत्र जोडावे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

| | |
|---|---|
| | प्रकाशित लेखांचा तपशिल : |
| | प्रकाशित पुस्तकांचा तपशिलः |
| १० | पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशिल |
| ११ | अर्जासोबत कोणतेही कागदपत्रे जोडु नयेत. |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती ........................................ प्रतिज्ञापुर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती पुर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशिर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही. आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:-

उमेदवाराची स्वाक्षरी

## प्रतिज्ञापत्र (विवाहित उमेदवारांसाठी)

## महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ नुसार

### नियम -अ

मी श्री/श्रीमती .................................... श्री .................. ...... यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, वर्षे .......... राहणार याव्दारे प्रमाणित करतो/करते की,

१. मी ................................ या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ............ (संख्या) इतके हयात मुले आहेत.
त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ यानंतर जन्माला आलेली मुलांची संख्या .......... आहे.
(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

३. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे या पदासाठी अनर्ह/अपात्र ठरविण्यास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक:-

उमेदवाराचे नाव व सही.

महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,वजिराबाद,नांदेड
OFFICE OF THE DEAN,GOVT. AYURVED COLLEGE,VAZIRABAD,NANDED
Ph.No.&Fax No.(24062) 234026 E-mail ID:- gac.nanded@gmail.com

जा.क्र.शाआमनां/आस्था-/डि-१/ २२८६ /२०२१ दिनांक: ०२ /०७/२०२१

कार्यालयीन आदेश

विषय :- कंत्राटी पध्दतीवरील प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक नियुक्ती.

संदर्भ :- १.वै.शि.व औ.द्र.वि.शा.नि.क्रमांक एमईएस१५०८/प्र.क्रं.९८/०८/वैसेवा१,
दिनांक ०७.०९.२०११
२.क्रं.आसंमु/आस्था/कपनि/२०२१/आयु-३/७५५८/दि.११ जुन २०२१

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास आदेश देण्यांत येते की, या महाविद्यालयात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरीता करार पध्दतीवर प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक पदे भरण्याबाबतची जाहिरात कार्यालयाच्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेडच्या अधिकृत संकेतस्थळावर (gac.nanded@gmail.com) प्रसिध्द करावी.

(वैद्य वाय.आर.पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
नांदेड.

प्रति,
वैद्य व्ही.पी.उखळकर,प्राध्यापक (नामा),
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड